# ७.

# पशुगणना / कार्यक्रम अंदाजपत्रक

# ७. पशुगणना (१०० % केंद्र पुरस्कृत योजना)

देशाच्या/राज्याच्या धोरणात्मक विकासामध्ये नियोजन हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. देशाची/राज्याची प्रगती ही त्या देशाने/राज्याने केलेल्या नियोजनावर अवलंबून असते आणि शासनाला नियोजनासाठी पायाभूत सांख्यिकी माहितीची अत्यंत आवश्यकता असते आणि अशी पायाभूत माहिती ही गणनेच्या स्वरूपात गोळा केली जाते. यासाठी एखाद्या क्षेत्राचा विकासावर त्या क्षेत्राची प्रगती अवलंबून असते. या सर्व बाबींचा मूळ पाया म्हणजे सांख्यिकी आकडेवारी गोळा करणे व त्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत पशुगणना हा महत्त्वाचा राष्ट्रीय कार्यक्रम आहे. केंद्र शासनाकडून विविध विभागांचे सर्वेक्षण/गणना/नमुना पाहणी गरजेनुसार ठराविक कालावधीमध्ये केल्या जातात.त्यानुसार पशुसंवर्धन विभागामध्ये दर पाच वर्षांनी पशुगणना केली जाते. पशुसंवर्धन विभागाची पहिली पशुगणना सन १९२० मध्ये घेण्यात आली. केंद्र शासन धोरणानुसार दर पाच वर्षांनी पशुगणना घेण्यात आली असून आत्तापर्यंत १८ पशुगणना घेण्यात आलेल्या आहेत.

केंद्र शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार राज्यनिहाय पहिल्या पंचवार्षिक पशुगणनेची सुरुवात भारतात (मुंबई राज्य) १९१९ ते एप्रिल-१९२० मध्ये घेण्यात आली. तेव्हापासून आजतागायत संपूर्ण भारतात पंचवार्षिक पशुगणना करण्यात येत आहेत.

दुसरी पशुगणना सन १९२४-१९२५ मध्ये घेण्यात आली. या पशुगणनेमध्ये प्राथमिकस्तरावर मोठ्या प्रमाणात पशुगणनेची आकडेवारी गोळा करण्याचा कालावधी ठरविण्यात आला. त्यासाठी १९२८ मध्ये भारतामधील रॉयल कमिशन ऑफ ॲग्रीक्लचर यांचे कडून संपूर्ण भारतामध्ये कमीत कमी वेळात पशुगणनेचे कामकाज काळजीपूर्वक घेण्यासाठी मार्गदर्शन घेण्यात आले होते. त्यामुळे पशुगणनेचे कामकाज अधिक सहज व अचूक करण्यात आले.

तिसरी पशुगणना जानेवारी १९३० मध्ये घेण्यात आली. यासाठी मुंबई आणि सर्व केंद्रशासित प्रदेश आणि स्वतंत्र राज्याना सामावून घेण्यात आले होते. चौथी व पाचवी पशुगणना जानेवारी १९३० आणि १९४० मध्ये अनुक्रमे घेण्यात आली.

१९४४ मधील पशुगणनेच्या सांख्यिकी आकडेवारी मध्ये पशुधनबाबतची आकडेवारी अचूक नसल्यामुळे ही पशुगणना निष्फळ ठरविण्यात आली. त्यानंतर मुंबई कायद्यानुसार तात्काळ वार्षिक पशुगणना १९५० पर्यत घेण्याचे ठरविण्यात आले.

केंद्र शासनाचे कृषि विभागाच्या मान्यतेने सन १९५१ मध्ये ७ व्या पशुगणनेमध्ये कृषि गणनेचा समावेश करावा व पशुगणना अर्थ व सांख्यिकी संघटना यांच्याकडून घेण्यात यावी व घेण्यात येणाऱ्या पशुगणनेमध्ये व्यापित भाग, माहिती गोळा करण्याचा निश्चित संदर्भ दिनांक आणि प्राथमिक स्तरावर प्रगणकांमार्फत आकडेवारी गोळा करण्याची पध्दत इत्यादी ठरविण्यात आले.

१९६१ च्या महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून ९ ते ११ वी पशुगणना अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई यांचे कडून घेण्यात आल्या व त्या पुढील १२ ते १८ वी पशुगणना आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून घेण्यात आल्या.

**पशुगणना योजनेच्या ठळक बाबी :-**

केंद्र शासनाच्या प्रचलित धोरणानुसार १८ व्या पंचवार्षिक पशुगणना योजनेमध्ये गाय, म्हैस, मिथुन, याक, मेंढरे, शेळ्या, घोडे, शिंगरे, खेचरे, गाढवे, उंट, डूकरे, कुत्री व ससे या वर्गातील प्रजातीनिहाय संख्या तसेच परसातील कुक्कुट पक्षी, कुक्कुट प्रक्षेत्र तसेच पशुधन आणि कुक्कुटासाठी जनावरांच्या/प्राण्यांच्या सहाय्याने चालणारी कृषी अवजारे व उपकरणे, त्यांची संख्या, त्यांचा वापर व मत्स्यव्यवसाय आकडेवारी या ठळक बाबीचा समावेश करण्यात आला होता. तथापी आगामी १९ व्या पशुगणनेमध्ये जनावरांच्या/प्राण्यांच्या सहाय्याने चालणारी कृषी अवजारे व उपकरणे, त्यांची संख्या, त्यांचा वापर व मत्स्यव्यवसाय आकडेवारी गोळा केली जाणार नाही असा केंद्र शासन स्तरावर निर्णय घेण्यात आलेला आहे.

**पशुगणना योजनेचा उद्देश :-**

१. ऑल इंडिया पशुगणनेचा मूळ उद्देश विहित केलेल्या नमुन्यामध्ये जागतिक स्तरावर पशुधनाची व कुक्कुटादी पक्षाची संतुलित माहिती पुरविणे.

२. पशुधनाची इतर उत्पादन विषयी माहिती पुरविणे.

३. पशुधन हा ग्रामीण भागातील महत्त्वाचा उद्योग आहे, त्यामुळे विविध प्रकारच्या कामकाजासाठी पशुगणनेच्या आकडेवारीचा नियमित उपयोग होतो.

४. पशुगणनेची आकडेवारी एखाद्या विशिष्ठ कामाच्या नियोजनासाठी व पशुधन विकास कामाच्या अंमलबजावणीसाठी उपयोगात येते.

**पशुगणना योजनेच्या आकडेवारीची गरज व उपयोगिता पुढीलप्रमाणे :-**

१. पशुगणनेमध्ये मुख्यतः वयोगटानुसार व प्रकारनिहाय आकडेवारी गोळा केली जाते.

२. आकडेवारीचा उपयोग राज्यातील दूध, अंडी, मांस, आणि लोकर उत्पादन यांचा अंदाज करणे तसेच मांस, अंडी व इतर उपपदार्थ यांच्या उत्पादनाची निर्यात केल्यामुळे देशास परकीय चलन प्राप्त होऊन राष्ट्रीय उत्पन्नात भर घालण्यात निश्चितच मदत होत आहे.

३. जनावरांचा लसीकरण कार्यक्रम राबविण्यासाठी, लसी निर्माण करण्याचा कार्यक्रम.

४. पशुगणनेच्या माहितीच्या आधारावर विविध प्रकारच्या पशुधनाचा शोध घेणे, पशुपैदास, गायी-म्हशीची संख्या ठरविणे, प्रती चौरस किलोमीटर पशुधन काढणे व पशुवैद्यकीय दवाखान्याची संख्या ठरविणे.

५. पशुगणनेच्या माहितीच्या आधारे पशुधन, कुक्कुटादी पक्षी यांचा वृध्दीदर ठरविता येतो.

६. जिल्ह्याचा व राज्याचा पशुधनाचा विकासाचा कार्यक्रम ठरविणे.

७. विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या योजनांचे नियोजन करणे.

**मागील १५, १६, १७, आणि १८ या चार पंचवार्षिक पशुगणनेनुसार महाराष्ट्र राज्यातील पशुधनाची तुलनात्मक आकडेवारी**

**(आकडे लाखात)**

| अ. क्र. | बाब | १५ वी पशुगणना १९९२ | १६ वी पशुगणना १९९७ | १७ वी पशुगणना २००३ | १८ वी पशुगणना २००७ (अस्थायी) |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **एकूण गो-वंशीय** | **१७४.४१** | **१८०.७१** | **१६७.३८** | **१६१.८४** |
| अ | पैदासक्षम गायी | ४८.७९ | ४५.९७ | ३७.७५ | ५१.८८ |
| ब | पैदासक्षम विदेशी/संकरित गायी | ८.९७ | १२.२३ | १४.६५ | १६.९२ |
| क | दुधातील गायी (देशी व संकरित) | २५.४७ | २९.१४ | २८.३२ | ३०.९९ |
| ड | शेती कामासाठी (ओढ शक्ती) उपयोगात आणले जाणारे बैल. | ६४.४९ | ६४.३६ | ६२.०८ | ५५.८९ |
| **२** | **एकूण महिष वर्गीय** | **५४.४७** | **६०.७३** | **६०.८४** | **६०.७३** |
| | अ) पैदासक्षम म्हशी | ३२.०१ | ३५.८४ | ३५.०३ | ३४.८६ |
| | ब) दुधातील म्हशी | १७.९९ | २१.५१ | २२.५२ | २३.०७ |
| **३** | एकूण शेळ्या | ९९.४१ | ११४.३४ | १०४.४९ | १०३.९१ |
| **४** | एकूण मेंढ्या | ३०.७४ | ३३.६८ | ३१.७५ | २९.०९ |
| **५** | एकूण कुक्कुटवर्गीय पक्षी त्यापैकी सुधारित जातीचे. | ३२१.०८ (९३.९३) | ३५३.०७ (१०१.५९) | ३४५.०९ (११७.८३) | ६४७.५६ (४६८.१८) ( Backyard + Poultry farm ) |
| **६** | **एकूण पशुधन (कुत्रे वगळता)** | **३६३.९३** | **३९६.३८** | **३७०.५८** | **३५९.५४** |
| **एकूण पशुधन घटक** | | **२४७.००** | **२६२.०९** | **२५१.४८** | **२४३.६९** |

केंद्र शासनाकडे १८ व्या पशुगणनेची शीघ्र तक्तीकरणाची अस्थायी आकडेवारी उपलब्ध असून ती केंद्र शासनाने संकेत स्थळावर प्रसिध्द केलेली आहे.

**पशुगणना योजनेची पंचवार्षिक प्रकाशने :-**

केंद्र शासनाच्या प्रचलित धोरणानुसार पंचवार्षिक पशुगणना योजनेमध्ये गाय, म्हैस, मिथुन, याक, मेंढरे, शेळ्या, घोडे, शिंगरे, खेचरे, गाढवे, उंट, डुकरे, कुत्री व ससे या वर्गातील प्रजाती निहाय संख्या तसेच परसातील कुक्कुट पक्षी, कुक्कुट प्रक्षेत्र तसेच पशुधन आणि कुक्कुटासाठी जनावरांच्या/प्राण्यांच्या सहाय्याने चालणारी कृषी अवजारे व उपकरणे, त्यांची संख्या, त्यांचा वापर व मत्स्यव्यवसाय आकडेवारी या ठळक बाबीचा समावेश असलेल्या विश्लेषणात्मक व गुणात्मक अहवाल तयार करून दर पाच वर्षाने प्रकाशित केला जातो. या प्रकाशनाचा व अहवालाचा केंद्र व राज्य शासनास धोरणात्मक विकासासाठी नियोजन करणे व संशोधन व संवर्धन करणे निर्णय घेण्यासाठी तसेच राज्यातील पशुधनाविषयी कार्य करणारे उद्योग, संस्था यांना या प्रकाशनाचा उपयोग होतो.

## कार्यक्रम अंदाजपत्रक

- पशुसंवर्धनासाठी राबविल्या जाणाऱ्या विविध विकास योजनांची तसेच उद्दिष्टानुसार झालेल्या तांत्रिक कामकाजाच्या नियोजनाच्या दृष्टीने उपलब्ध साधन सामुग्री व सध्याची क्षमता यासंबंधीची माहिती आवश्यक असते. त्याचप्रमाणे योजना व कार्ये यापासून साध्य केलेल्या प्रगतीची आकडेवारी संकलित करून त्यांचे मुल्यमापन आगामी नियोजनासाठी आधारभूत करणेसाठी कार्यक्रम अंदाजपत्रक हा एक महत्त्वाचा कार्यक्रम पशुसंवर्धन विभागामार्फत तयार करणेचे काम करण्यात येते.
- कार्यक्रम अंदाजपत्रक तयार करणेचे काम हे सन १९८९ या वर्षापासून सुरू केले.
- या अंतर्गत संपूर्ण पशुसंवर्धन विभागाचे राज्य स्तरावर तांत्रिक बाबींच्या कामाची आकडेवारी संकलित करण्यात येते. जसे कृत्रिम रेतन, जन्मणाऱ्या वासरांची संख्या, औषधोपचार, शस्त्रक्रिया, गर्भधारणा तपासणी, वंध्यत्व तपासणी, लसीकरण, खच्चीकरण, वासरांचे मेळावे, पशुप्रदर्शन, कार्यमोहिमा, बियाणे वाटप, वैरण भूखंड तयार करणे, शेतकरी प्रशिक्षण.
- कार्यक्रम अंदापत्रकामध्ये वरीलप्रमाणे तांत्रिक बाबींची माहिती जिल्हानिहाय ३३९ संस्थानिहाय गतवर्षी झालेले काम/चालू वर्षाचे अपेक्षित /पुढील वर्षाचे लक्ष्य समाविष्ट असते.
- सदर कार्यक्रम अंदाजपत्रक हे जिल्हापातळीवरील अधिकारी हे आयुक्त कार्यालयामध्ये येऊन त्याचे अंतिम नियोजन केले जाते व हे अंदाजपत्रक अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये सादर केले जाते.
- सदरचे कार्यक्रम अंदाजपत्रक हे पुढील नियोजनासाठी अत्यंत महत्त्वाचा कार्यक्रम आहे.

## पशुसंवर्धन सांख्यिकी पुस्तिका

- सदरची पुस्तिका दरवर्षी प्रकाशित करण्यात येते.
- सदर पुस्तिकेमध्ये खालील बाबी समाविष्ट असतात -
  १) जिल्हानिहाय पशुवैद्यकीय संस्था,
  २) पशुसंवर्धन विभागाचे काही निवडक बाबींवर झालेले कार्य,
  ३) जिल्हानिहाय कृत्रिम रेतने व जन्मलेल्या वासरांची संख्या,
  ४) जिल्हानिहाय उपचार, लसीकरणे, शस्त्रक्रिया, गर्भधारणा, वंध्यत्व तपासणी केलेली जनावरे,
  ५) पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्था, लसमात्रा, अभिकारके, द्रावणे, कत्तलखाना, कुक्कुट, बदक, अंडी उबवणी केंद्रे, दूध, अंडी, लोकर, प्रत्यक्ष मांस, स्थूल मूल्य अशा अनेक बाबींची जिल्हानिहाय माहिती समाविष्ट असते.

| तक्ता क्रमांक ५ | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| राज्यातील कार्यरत असलेल्या पशुवैद्यकीय संस्थांची जिल्हावार ३१ मार्च २०१० ची स्थिती (संख्या) | | | | | | | | | | | | | |
| अ. क्र. | जिल्हा / विभाग | जिल्हा परिषद | | फिरते पशुवैद्यकीय दवाखाने | राज्यस्तरीय संस्था | | | | | | | | |
| | | पशुवैद्यकीय दवाखाने | | | तालुका स्तरीय लघु पशु सर्व चिकित्सालये | | | | | | पशुवैद्यकीय दवाखाने | | |
| | | श्रेणी -१ | श्रेणी -२ | | मुख्यालय | श्रेणी -१ | | | | श्रेणी -२ | मुख्यालय | श्रेणी -१ | श्रेणी -२ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ८ | ९ | १० | ११ |
| १ | ठाणे | ६१ | ८७ | २ | ६ | ० | | | | ० | १ | ० | ० |
| २ | रायगड | ३१ | ५८ | १ | ६ | ० | | | | १५ | १ | ० | ० |
| ३ | रत्नागिरी | २१ | ५१ | २ | ४ | ० | | | | ४५ | १ | ० | ३० |
| ४ | सिंधुदुर्ग | १० | ६० | ७ | ४ | १० | | | | १० | १ | ० | ० |
| **मुंबई विभाग** | | **१२३** | **२५६** | **१२** | **२०** | **१०** | **०** | **०** | **०** | **७०** | **४** | **०** | **३०** |
| ५ | नाशिक | ९२ | १३३ | २ | ६ | ० | ८ | ८ | ८ | १५ | १ | ० | ० |
| ६ | धुळे | ३९ | ३१ | १ | ३ | ० | ० | ० | ० | १७ | १ | ० | २१ |
| ७ | नंदूरबार | ४५ | ३७ | १ | ५ | ० | ० | ० | ० | १५ | ० | ० | ० |
| ८ | जळगाव | ७८ | ७५ | १ | ६ | ० | ० | ० | ० | २२ | १ | ० | ० |
| ९ | अहमदनगर | ७४ | १४९ | १ | ६ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० |
| **नाशिक विभाग** | | **३२८** | **४२५** | **६** | **२६** | **०** | **८** | **८** | **८** | **६९** | **४** | **०** | **२१** |
| १० | पुणे | ६१ | १२७ | २ | ५ | ६ | ८ | ८ | ८ | ५९ | १ | २ | २२ |
| ११ | सातारा | ५५ | ११४ | २ | ५ | ४ | ४ | ४ | ४ | १२ | १ | ० | ० |
| १२ | सांगली | ७५ | २६ | १ | ५ | ६ | ७ | ७ | ७ | ३२ | १ | १ | ६ |
| १३ | सोलापूर | ५६ | ११६ | ० | ५ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० |
| १४ | कोल्हापूर | ८२ | ५७ | २ | ६ | ८ | ८ | ८ | ८ | २२ | १ | ० | ० |
| **पुणे विभाग** | | **३२९** | **४४०** | **७** | **२६** | **२४** | **२७** | **२७** | **२७** | **१२५** | **५** | **३** | **२८** |
| १५ | औरंगाबाद | ३२ | ४९ | ० | ५ | १ | १ | १ | १ | २८ | १ | ० | ४ |
| १६ | जालना | ३१ | २२ | १ | ५ | ० | १ | १ | १ | ३२ | १ | ० | ७ |
| १७ | परभणी | २८ | ४८ | ० | ५ | ० | ० | ० | ० | ३ | ० | ० | ० |
| १८ | बीड | ५२ | ८७ | १ | ५ | ० | ० | ० | ० | १३ | १ | ० | २ |
| **औरंगाबाद विभाग** | | **१४३** | **२०६** | **२** | **२०** | **१** | **२** | **२** | **२** | **७६** | **३** | **०** | **१३** |
| १९ | लातूर | ३० | ९१ | १ | ६ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० |
| २० | उस्मानाबाद | ३७ | ५५ | १ | ५ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० |
| २१ | नांदेड | ७३ | १०३ | १ | ५ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० |
| २२ | हिंगोली | २२ | ४१ | ० | ५ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |

## तक्ता क्रमांक ५--चालू

### राज्यातील कार्यरत असलेल्या पशुवैद्यकीय संस्थांची जिल्हावार ३१ मार्च २०१० ची स्थिती (संख्या)

| अ. क्र. | जिल्हा / विभाग | जिल्हा परिषद | | फिरते पशुवैद्यकीय दवाखाने | राज्यस्तरीय संस्था | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पशुवैद्यकीय दवाखाने | | | तालुका स्तरीय लघु पशु सर्व चिकित्सालये | | | | | | पशुवैद्यकीय दवाखाने | | |
| | | श्रेणी -१ | श्रेणी -२ | | मुख्यालय | श्रेणी -१ | | | | श्रेणी -२ | मुख्यालय | श्रेणी -१ | श्रेणी -२ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ८ | ९ | १० | ११ |
| **लातूर विभाग** | | **१६२** | **२९०** | **३** | **२१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **३** | **०** | **०** |
| २३ | अमरावती | ४० | ५९ | २ | ६ | २० | २८ | २८ | २८ | ३१ | १ | ८ | १ |
| २४ | अकोला | २७ | ४० | १ | ५ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० |
| २५ | वाशीम | १७ | ३६ | ० | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २६ | बुलढाणा | ३३ | ७७ | २ | ६ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० |
| २७ | यवतमाळ | ४७ | १३५ | १२ | ७ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० |
| **अमरावती विभाग** | | **१६४** | **३४७** | **१७** | **२८** | **२०** | **२८** | **२८** | **२८** | **३१** | **४** | **८** | **१** |
| २८ | नागपूर | ४२ | ५८ | २ | ५ | १ | १ | १ | १ | ६१ | १ | ० | ११ |
| २९ | वर्धा | २६ | ६२ | १ | ५ | ० | ० | ० | ० | १४ | १ | ० | १ |
| ३० | भंडारा | १९ | ३४ | १ | ५ | ११ | ११ | ११ | ११ | १२ | १ | ० | ३ |
| ३१ | गोंदिया | ३० | ३४ | १ | ४ | ५ | ५ | ५ | ५ | २१ | १ | ० | ० |
| ३२ | चंद्रपूर | २८ | ११८ | ६ | ६ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० |
| ३३ | गडचिरोली | ९५ | ३९ | ७ | ५ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० |
| **नागपूर विभाग** | | **२४०** | **३४५** | **१८** | **३०** | **१७** | **१७** | **१७** | **१७** | **१०८** | **६** | **०** | **१५** |
| **महाराष्ट्र राज्य** | | **१४८९** | **२३०९** | **६५** | **१७१** | **७२** | **८२** | **८२** | **८२** | **४७९** | **२९** | **११** | **१०८** |

♦♦♦